महाराष्ट्र शासन
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा
District Institute of Education & Training, Bhandara
Email: dietbhandara@maa.ac.in ; dietbhandara@gmail.com

जाक्र:- जिशिप्रसं/भंडारा/व्हिडीओ निर्मिती स्पर्धा / 667 /2025. दिनांक : 29/10/2025

**प्रति,**

1. मा. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण(सर्व)
2. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
3. शिक्षणाधिकारी(प्राथ/माध्य./योजना) (सर्व)
4. गटशिक्षणाधिकारी, पं.स. (सर्व)
5. प्रशासन अधिकारी, न.प. (सर्व).

**विषय : शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेचे आयोजन करणेबाबत..**

**संदर्भ** : 1. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र. 10.10.2025.
2. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र. 17.10.2025.
3. शिक्षक, कर्मचारी व अधिकारी स्पर्धा मार्गदर्शिका.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशत: अनुदानित- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, डायटमधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिगंत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष 2025-26 पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आलेली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण 43 विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धांचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक, कर्मचारी व अधिकारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. यापैकी शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, भंडारा या कार्यालयाकडे देण्यात आलेली आहे.

- **शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेसाठी नियमावली —**

  या स्पर्धेचे आयोजन हे तालुका, विभाग व राज्यस्तरावर केले जाईल.

  अ) **तालुकास्तर:**

  1. या स्तरावरील स्पर्धेचे आयोजन हे ऑनलाईन स्वरुपात केले जाईल.
  2. व्हिडीओची कालमर्यादा- किमान 5 मिनिटे ते कमाल 8 मिनिटे.
  3. एकूण 100 गुण.
  4. या स्तरावरील प्रथम येणारा विजेता हा विभाग स्तरासाठी पात्र राहील.
  5. स्पर्धेचे मूल्यांकन व सविस्तर गुणांकन तवता (Rubrics) खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | मूल्यांकन निकष | गुण |
|---|---|---|
| 1. | सामग्रीची गुणवत्ता (Content Quality) | 25 |
| 2. | अध्यापनशास्त्रीय उपयुक्तता (Pedagogical Value) | 20 |
| 3. | दृश्य मांडणी व व्हिडीओ संपादन (Visual Design & Editing) | 15 |
| 4. | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity & Originality) | 10 |
| 5. | तांत्रिक बाजू (Technical Execution – Audio/ Visual Quality) | 10 |
| 6. | संवाद व सादरीकरण कौशल्ये | 10 |
| 7. | सूचनांचे पालन (Adherence to Guidelines) | 10 |

**रुब्रिक तपशील :**

- **सामग्रीची गुणवतता** : माहिती सखोल, अचूक व विषयाशी सुसंगत आहे का?
- **शैक्षणिक उपयुक्तता**: व्हिडीओ विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे का?
- **दृश्य व संपादन**: व्हिडीओचे दृश्य सादरीकण आकर्षक, संतुलित व नीटनेटके आहे का?
- **सर्जनशीलता** : शैली, संकल्पना व सादरीकरणातील मौलिकता किती आहे?
- **तांत्रिक बाजू** : ऑडीओ-व्हिडीओ गुणवत्ता, संपादन, सबटायटल्सची स्पष्टता (असल्यास) इ.
- **प्रस्तुतीकरण कौशल्ये**: संवादशैली, आवाज, आत्मविश्वास, स्पष्टता.
- **सूचनांचे पालन** :कालावधी, फॉरमॅट, ओळख, कॉपीराईट यांचे पालन.

**ब) विभाग स्तर:**

1. या स्तरावरील स्पर्धेचे आयोजन हे ऑनलाईन स्वरुपात केले जाईल.
2. एकूण 100 गुणांपैकी जास्तीत जास्त गुण मिळविणारे 05 विजेते राज्य स्तरासाठी पात्र राहील.

**क) राज्य स्तर :**

1. या स्तरावरील स्पर्धेचे आयोजन हे ऑनलाईन स्वरुपात केले जाईल.
2. एकूण 100 गुणांपैकी जास्तीत जास्त गुण मिळविणारे 10 विजेते निवडण्यात येतील.

- **वेळापत्रक**

  सदर स्पर्धा तालुका, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे:-

  1. तालुकास्तरीय स्पर्धा – नोव्हेंबर 2025 (चौथा शुक्रवार)
  2. विभागस्तर स्पर्धा – डिसेंबर 2025 (चौथा शुक्रवार)
  3. राज्यस्तर स्पर्धा – जानेवारी 2026 (चौथा शुक्रवार)
- या सर्व कामात गोपनियता असणे अत्यंत आवश्यक आहे.

**सोबत : संदर्भ पत्र.**

**(राजेश काशिनाथ रुद्रकार)**
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
भंडारा

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-

1. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
2. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
3. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. (सर्व).
4. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व).